LOKMAT, Mumbai, 1.3.2024
Page No. 2, Size:(14.72)cms X (6.83)cms.

**Bullet in the Tunnel , under sea tunnel excavation work in progress**

# 'बुलेट' इन द टनेल... समुद्राखालून जाणारा बोगदा खणायला सुरुवात





**सुरत येथील एनएच ५३ वरील पहिल्या स्टील ब्रीजचे कामही पूर्ण झाले आहे.**

७० मीटर लांबीचा आणि ६७३ मेट्रिक वजनाचा हा पूल आहे. २८ पैकी १६ पूल वेगवेगळ्या ठिकाणी बांधले जात आहेत.



२४ नदी पुलांपैकी ७ नदीपुलांचे काम झाले आहे.

**मुंबई : मुंबई ते अहमदाबाद या ५०८ किमी लांबीच्या बुलेट ट्रेन प्रकल्पातील महत्त्वाचा टप्पा असलेल्या समुद्राखालील बोगद्याच्या निर्मितीला सुरुवात झाली आहे. सात किमी लांबीच्या या बोगद्याचे दोन लाख ३५ हजार घनमीटरपर्यंत उत्खनन करण्यात आले आहे.**

प्रकल्पाची कार्यान्वियन यंत्रणा असलेल्या नॅशनल हायस्पीड रेल कॉर्पोरेशन लिमिटेड (एनएचएसआरसीएल) यांनी दिलेल्या माहितीनुसार, वांद्रे कुर्ला संकुल (बीकेसी) ते शिळफाटा या २१ किमी मार्गातील सात किमी लांबीचा मार्ग समुद्राखालून जाणार आहे. तसेच बोईसर, विरार आणि ठाणे या स्थानकांच्या उर्वरित अलाइनमेंटचे काम प्रगतिपथावर आहे. गुजरात आणि महाराष्ट्रामधील सर्व कामांची कंत्राटे देण्यात आली आहेत. १४३ किलोमीटरवरील गर्डर बसविण्यात आले असून, २८९ किमीवरील पिअर कास्टिंगचे काम पूर्ण झाले आहे. गुजरातसह महाराष्ट्रातील भूसंपादनाचे काम पूर्ण झाले आहे. शिवाय डेपो कामास इलेक्ट्रिकल कामांची कंत्राटे देण्यात आली आहेत. गुजरातमधील वलसाड येथील झरोली गावाजवळ ३५० मीटर लांबीचा आणि १२.६ मीटर व्यासाचा बोगद्याचे कामही पूर्ण झाले आहे.